जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५९ दिनांक - ०७/११/२०२४**

सिंहगडरोड पोलीस स्टेशन

**मोक्यातील व इतर तीन गुन्हयातील पाहिजे आरोपी तसेच फायरींगमधील फरार असलेल्या वेगवेगळ्या गुन्हयातील दोन आरोपींना अटक**

सिंहगडरोड पोलीस स्टेशन कडील गुन्हा रजि नं ४००/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०९(१),१११,६१(२) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५)(२७) सह महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७(१)(३) १३५,१४२, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) यामधील पाहीजे आरोपी नामे रवि मधुकर जाधव रा. संजीवन अपार्टमेंट जाधवनगर वडगाव बु पुणे हा गेली दोन महिन्यापासुन फरार असुन त्याचा शोध वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे करीत होते.

दि.०६/११/२०२४ रोजी तपास पथकातील पोलीस अधिकारी सचिन निकम, सहायक पोलीस निरीक्षक, संतोष भांडवलकर, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस स्टाफ असे पाहिजे आरोपी रवि मधुकर जाधव याचा शोध घेत असताना, पोलीस उपनिरीक्षक, संतोष भांडवलकर यांना गुप्त बातमी मिळाली की, दोन महिन्यापासुन पोलीसांना गुंगारा देणारा पाहीजे आरोपी रवि जाधव हा पठारवाडी, शिंदेवाडी येथील चर्तुःमुख महादेव मंदीर जवळील डोंगरावर लपुन बसला आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने लागलीच सदरची बातमी त्यांनी मा.वरिष्ठांना कळविली असता, सदर बातमीची खात्री करुन योग्य ती कार्यवाही करणे बाबत आदेश दिल्याने, सपोनि सचिन निकम, व पोउपनि संतोष भांडवलकर, व पोलीस स्टाफ असे, बातमीच्या ठिकाणी रवाना होवुन पाहीजे आरोपी रवि जाधव याचा पठारवाडी जवळील चर्तुःमुख महादेव मंदीर परिसरात डोंगराळ भागात शोध घेतला असता, तो मिळुन आल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव व पत्ता **रवि मधुकर जाधव वय २६ वर्षे रा. संजीवन हेरीटेज, जाधवनगर वडगाव बु पुणे**. असे असल्याचे सांगितले,

नमुद आरोपी रवि जाधव याचे बरोबर असलेला पाहीजे आरोपी नामे आश्विन ऊर्फ बारक्या लोणारे रा. धायरी गाव खडक चौक लोणार वस्ती, धायरी पुणे यास जागीच ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **आश्विन ऊर्फ बारक्या बाळकृष्ण लोणारे वय-२० वर्षे रा. धायरी गाव खडक**

**चौक लोणार वस्ती, धायरी पुणे** असे असल्याचे सांगितले त्यास पुढील योग्य त्या कारवाई कामी ताब्यात घेतले असुन तो पुढील गुन्हयामध्ये पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले ते गुन्हे पुढील प्रमाणे.....

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | सिंहगडरोड पोलीस स्टेशन | ३५९/२०२४ | भा द वि कलम ३०७ ३२३,५०४,३४, आर्म ॲक्ट ३(२५) |
| २ | वारजे माळवाडी पोलीस स्टेशऩ | ४२४/२०२४ | भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम १०९ ३५१(३),१८९(१),१८९(२),१८९(४),१९०,१९१(३),३(५) आर्म ॲक्ट कलम ४(२५) क्रिमीनल लॉ अमेंटमेड कलम ७ मपोका कलम ३७(१)(३) |

त्याच्याकडे दाखल गुन्ह्याबाबत अधिक तपास करता त्यांनी सदरचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने आरोपी नामे रवि मधुकर जाधव वय २६ वर्षे रा. संजीवन अपार्टमेंट जाधवनगर वडगाव बु पुणे यास मा.सहायक पोलीस आयुक्त, सिंहगडरोड विभाग पुणे शहर श्री.अजय परमार,यांचेकडील तपासाधीन मोक्का कायदयाअंतर्गत गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ -३ श्री. संभाजी कदम, मा. सहा पोलीस आयुक्त, सिंहगडरोड विभाग श्री अजय परमार, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राघवेंद्रसिंह क्षीरसागर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) उत्तम भजनावळे ,यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक, श्री. सचिन निकम, संतोष भांडवलकर, पोलीस उपनिरीक्षक आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार, संजय शिंदे, उत्तम तारु, पंकज देशमुख, अमोल पाटील, देवा चव्हाण, सागर शेडगे, शिवाजी क्षीरसागर, राहुल ओलेकर, स्वप्नील मगर, विनायक मोहीते, विकास पांडुळे, विकास बांदल, यांनी केली आहे.

